# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 05.55 वा.

**दिनांक- 26.11.2022** **वार- शनिवार**

---

ज्येष्ठ मराठी अभिनेते विक्रम गोखले यांचं आज पुण्यात निधन झालं. ते 77 वर्षांचे होते. गेल्या 17 दिवसांपासून त्यांना मधुमेह आणि जलोदरावरील उपचारांसाठी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पुण्याचे संपर्कमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्यासह विविध मान्यवरांनी त्यांच बालगंधर्व रंगमंदिरात त्यांच्या पार्थिव देहाचे अंत्यदर्शन हेतलं. पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत थोड्याच वेळात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. मराठी दूरचित्रवाणी मालिका 'तुझेच मी गीत गात आहे' आणि मराठी चित्रपट 'गोदावरी' यामधील त्यांचा अभिनय अखेरचा ठरला.

50 वर्षांहून अधिक कालावधीच्या कारकिर्दीत विक्रम गोखले यांनी नाटक, दूरचित्रवाणी आणि चित्रपट या तिन्ही माध्यमांद्वारे चतुरस्त्र अभिनयाची छाप पाडली होती. त्यांना अभिनयाचा दीर्घ आणि उत्कृष्ट वारसा लाभला होता. गोखले हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जात होते. सामाजिक कार्यातही धर्मादाय संस्थेद्वारे दिव्यांग सैनिक, कुष्ठरोग्यांची मुले आणि अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याचं काम ते करत होते. विक्रम गोखले यांच्या निधनाबद्दल नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे.

भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने आज बारामती इथं विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी संविधान उद्देशिकेचं सामूहिक वाचन केलं. हे जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे, असं मत पवार यांनी व्यक्त केलं.

संविधान दिना निमित्त पुण्यातील रमणबाग प्रशालेत, आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातले सहाय्यक प्राध्यापक, संजय तांबट यांचं व्याख्यान झाले. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करून देशाचे अखंडत्व कायम ठेवण्यासाठी केलेली व्यवस्था म्हणजे आपलं संविधान आहे असं त्यांनी सांगितलं.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित 'संविधान सन्मान दौड' मध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी झाले होते. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते दौडला सुरुवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्वांनी संविधानातील उद्देशिकेचं वाचन केलं. यावेळी बॉम्बे आर्मी सॅपर्सच्या बँड पथकानं राष्ट्रगीताची धून वाजवली. भारताच्या संविधानाबाबत प्रत्येकालाच माहिती असणं आवश्यक आहे. त्यासाठी संविधान हे विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग असायला हवं असं मत पाटील यांनी व्यक्त केलं. दौडमधील विजेत्यांना पारितोषिक वितरण पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते झालं. ते यावेळी बोलताना म्हणाले की, आज आपण प्रत्येक गोष्टीसाठी संविधान अभ्यासतो, ही संविधानाची ताकद आहे. या दौडमध्ये सहभागी झालेल्यांना आपले शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी अनुक्रमे 10, 5 आणि 3 किलोमीटर

धावण्याच्या या स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली तर सहभागींना प्रमाणपत्रं आणि पदकं देण्यात आली.

विद्यापीठाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीनं ख्राईस्ट विद्यापीठाचे विधी विभागाचे प्रमुख डॉक्टर प्रतापसिंह साळुंखे यांच्या व्याख्यानाचं आयोजन केलं होतं.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आज आणि उद्या विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेचं आज सामूहिक वाचन करण्यात आले. यानंतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सप्तखंजिरीवादक पवन दवंडे यांचा लोकप्रबोधनात्मक किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. दुपारच्या सत्रात कवी संमेलन आणि 'माध्यमातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यासमोरील आव्हानं' यावरील परिसंवाद हे कार्यक्रम पार पडले.

गोवर रुबेला निर्मूलनासाठी पुणे महापालिका हद्दीतील खासगी डॉक्टरांची बैठक घेण्यात आली. याशिवाय येत्या आठवड्यात बालरोगतज्ज्ञांची बैठकही घेण्यात येणार असल्याचे महापालिकेचे सहाय्यक आरोग्य प्रमुख डॉ. सूर्यकांत देवकर यांनी सांगितले. ज्या ठिकाणी गोवर झालेला रुग्ण आढळेल, त्याच्या आजूबाजूच्या 100 घरांचं सर्वेक्षण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

36 वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन रविवारी 4 डिसेंबर 2022 रोजी 'नाईट मॅरेथॉन' म्हणून आयोजित केली जात असून, विजेत्या धावपटूंना पुणे महानगरपालिकेतर्फे 35 लाख रुपयांची बक्षिसं देण्यात येणार आहेत. सुमारे 15 हजारहून अधिक महिला आणि पुरुष धावपटूंचा सहभाग यंदा या मॅरेथॉनमध्ये असेल. तसेच 80 हून अधिक परदेशी महिला आणि पुरुष धावपटूंचा देखील सहभाग अपेक्षित आहे, अशी माहिती पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे अध्यक्ष अभय छाजेड यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ राहिल्यानं किमान तापमानात वाढ झाली. किमान तापमान 19 अंश तर कमाल तापमान 32 अंश सेल्सियसच्या आसपास होतं. उद्याही असंच हवामान ढगाळ राहील. किमान तापमान 16 अंश तर कमाल तापमान 32 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 5 वाजून 55 मिनिटांनी, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**